महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन ज्ञापन क्र. दुरुस्ती-०११९/प्र.क्र.११२/पोल-७.

मंत्रालय, दुसरा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२.

दिनांक १८ सप्टेंबर २०१९.

<u>विषय</u> :- पोलीस अधीक्षक, रायगड, यांच्या आस्थापनेवरील पोलीस ठाणे, अलिबाग, येथील पोलीस बिनतारी विभाग कार्यालय, कर्मशाळा *(Workshop),* वाहतूक नियंत्रण कार्यालय, पोलीस कर्मचारी यांचे प्रसाधनगृह यांची दुरुस्ती व नूतनीकरण यांची विवक्षित कामे करण्यासाठी प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबत.

संदर्भ :-

१) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१४/ प्र.क्र.४९/ १४/ विनियम, दिनांक ०५.०१.२०१५.

२) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/१३/विनियम, भाग-२, दिनांक १७.०४.२०१५.

३) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई, यांचे पत्र क्र. पोमसं/ १९-ए/ रायगड-पो.ठा.-अलिबाग/प्र.इ.-नूतनीकरण/५२/२०१९, दिनांक ०७.०५.२०१९.

४) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई, यांचे पत्र क्र. पोमसं/ १९-ए/ रायगड-पो.ठा.-अलिबाग/प्र.इ.-नूतनीकरण/५२/२०१९, दिनांक २०.०७.२०१९.

ज्ञापन.

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, यांनी पोलीस अधीक्षक, रायगड, यांच्या आस्थापनेवरील पोलीस ठाणे, अलिबाग, येथील पोलीस बिनतारी विभाग कार्यालय, कर्मशाळा *(Workshop),* वाहतूक नियंत्रण कार्यालय, पोलीस कर्मचारी यांचे प्रसाधनगृह यांची दुरुस्ती व नूतनीकरण यांची विवक्षित कामे करण्यासाठी रु.२३,३७,३८५/- इतक्या खर्चाच्या अंदाजास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव सादर केला आहे.

२. उक्त खर्चाचे अंदाज हे उप अभियंता, सा.बां. उपविभाग, अलिबाग, यांनी सन २०१८-१९ च्या दरसूचीनुसार तयार केले असून ते कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, अलिबाग, यांनी साक्षांकित केले आहेत.

३. उक्त खर्चाचे अंदाज हे सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, यांनी तपासले आहेत व ते रु.२१,८६,०००/- असे सुधारित केले आहेत आणि, विवक्षित अटींवर, प्रशासकीय मान्यता देण्यास सहमती दिली आहे.

४. त्या अनुसार, पोलीस अधीक्षक, रायगड, यांच्या आस्थापनेवरील पोलीस ठाणे, अलिबाग, येथील पोलीस बिनतारी विभाग कार्यालय, कर्मशाळा *(Workshop),* वाहतूक नियंत्रण कार्यालय, पोलीस कर्मचारी यांचे प्रसाधनगृह यांची दुरुस्ती व नूतनीकरण यांची विवक्षित कामे करण्यासाठी रु.२१,८६,०००/- *(रुपये एकवीस लक्ष, शहाऐंशी हजार फक्त)* इतक्या खर्चाच्या अंदाजास, पुढील अटींवर, याद्वारे, प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे:-

१) विशेष पोलीस महानिरीक्षक, कोकण परिक्षेत्र, यांनी खर्चाचे अंदाज साक्षांकित करणे आवश्यक आहे.
२) निधी उपलब्ध झाल्याशिवाय काम सुरु करु नये.

५. उक्त कामासाठी येणारा खर्च हा गृह विभाग--मागणी क्र. बी-१, २०५५, पोलीस, (००) १०९, जिल्हा पोलीस, (००)(०१) जिल्हा पोलीस बल (२०५५ ०१६८) (अनिवार्य)(दत्तमत), २७-लहान बांधकामे, याखाली उपलब्ध असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

६. हे ज्ञापन सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.३६३/१९/इमा.-२, दिनांक ०७.०८.२०१९, अन्वये मिळालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

७. हे ज्ञापन महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेतांक २०१९०९१८१६२७४१२७२९ असा आहे. हे ज्ञापन डीजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SWAPNIL GOPAL BORSE

Digitally signed by SWAPNIL GOPAL BORSE
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=c6a6e7cad855fc787a96e36f11fbc87a9f66cfd9bad01184493f2735ad885627, postalCode=400032, street=2ND FLOOR,MANTRALAYA,MADAME CAMA MARG,MUMBAI, serialNumber=8538cd1e408948f7d025537d5f6589bd8958d1b95322e66d2cc5edf89ad0d79e, ou=HOME DEPT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=SWAPNIL GOPAL BORSE
Date: 2019.09.18 16:33:31 +05'30'

(स्वप्नील गोपाल बोरसे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) विशेष पोलीस महानिरीक्षक, कोकण परिक्षेत्र, नवी मुंबई.
३) पोलीस अधीक्षक, रायगड.

प्रत-

१) अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडल, रायगड, मुक्काम-नवी मुंबई *(सा.बां. विभाग, यांनी सुधारित केलेल्या "Recapitulation Sheet" च्या प्रतीसह).*
२) कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, अलिबाग *(सा.बां. विभाग, यांनी सुधारित केलेल्या "Recapitulation Sheet" च्या प्रतीसह).*
३) प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई.
४) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर.
५) कार्यासन अधिकारी (इमा.-२), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) कार्यासन अधिकारी (व्यय-७/विनियम), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) निवड फाईल (पोल-७).